विशेष पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक १७/११/२०२२

# तडीपार असलेल्या सराईत गुन्हेगारांस ताब्यात घेवुन तिन घरफोडीचे गुन्हे आणले उघडकीस स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

यवतमाळ जिल्हयात वाढत्या चोरी, घरफोडी चे गुन्हयांना प्रतिबंधक करण्यासाठी व घडलेल्या गुन्हे उघडकीर आणण्याकरीता मा. पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना आदेशीत केल होते त्याच अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी त्यांचे अधिनस्त पथकांना अभिलेखावरील गुन्हेगारांच गोपनिय माहीती काढुन गुन्हे उघडकीस आणने बाबत सुचना दिल्या होत्या.

दिनांक १६/११/२०२२ रोजी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, यांचे आदेशानुसार स्थागुशा चे पथक पेट्रोलींग करीत असतांना माहीती मीळाली की, उपविभागीय दंडाधिकारी, यवतमाळ यांचे आदेशान्वये एक वर्षा करीता तडीपार असलेला सराईत गुन्हेगार अविनाश लंगोटे हा विनापरवाणा यवतमाळ शहरात वास्तव्यास असुन त्याने चोरी केलेला एक लॅपटॉप विक्री केला आहे अशा माहीतीवरुन अविनाश लंगोटे याचा शोध घेतला असता नमुद इसम हा आर्णी रोड वडगांव नाका परिसरात तडीपार असतांन शासनाची पुर्व परवाणगी नसतांना मीळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने लक्ष्मण जाधव रा. लोहारा याचे सोबत मिळुन लोहारा व अवधुतवाडी परिसरातील तीन ठिकाणी घर फोडी केल्याचे सांगुन गुन्हयातील लॅपटॉप विक्री केल्याच सांगीतल्याने लक्ष्मण जाधव याचा शोध घेतला असता मिळुन आला नाही.

आरोपी नामे अविनाश लंगोटे याने दिलेल्या माहीती नुसार अविनाश लंगोटे व लक्ष्मण जाधव याने चोरी करुन विक्र केलेला मुद्येमाल १) इसम नामे रिजवान रफीक मलनस धंदा चिकन सेंटर रा. यवतमाळ २) अरहंत उर्फ बिट्टु सुनिल काळे वय ३ वर्ष रा. सुर्योदय नगर, यवतमाळ ३) कश्यप प्रदिप गवळी वय २० वर्ष ४) शुभम प्रभाकर सरोदे वय २४ वर्ष सर्व रा. यवतमाळ यांचे ताब्यातुन १) दोन डेल कंपनीचे लॅपटॉप किं.अं. ५५,०००/- रु २) तिन सोनी कंपनीचे एल.ई.डी. टिव्ही किं.अं. १,२०,०००/- रु ३ एक सॅमसंग कंपनीचा टॅबलेट फोन कि.अं. १०,००० ४) दोन नग एच.पी. कंपनीचे गॅस सिलेंडर कि.अं. २,०००/- असा एकुण २,२७,०००/- रु चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपीतांकडुन अद्याप पावेतो पोलीस स्टेशन लोहारा चे अभिलेखावरील दोन घरफोडीचे गुन्हे, पोलीस स्टेशन अवधुतवाडीचे अभिलेखावरील एक गुन्हा उघडकीस आला असुन त्याचे ताब्यातील वरील नमुद गुन्हयातील मुद्देमाल व्यतिरीक्त एव टिव्ही व एक लॅपटॉप, व टॅबलेट फोन हे कोठुन चोरी गेलेले आहेत याचा शोध सुरु असुन नमुद आरोपीतांपैकी फरार असलेल गुन्हेगार लक्ष्मण जाधव याचा शोध सुरु असुन आरोपीतांकडुन आणखी गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ डॉ. श्री. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक श्री. पियुष जगताप यांचे मार्गदर्शनात श्री. प्रदीप परदेशी पो.नि. स्थागुशा,सपोनि गणेश वनारे, सपोनि अमोल मुडे, सपोनि विवेक देशमुख, पोउपनि साग भारस्कर, पोहवा बंडु डांगे, पोहवा उल्हास कुरकुटे, विनोद राठोड, निलेश राठोड, सुधीर पिदुरकर, किशोर झेंडेकर, महेश नाईक रजनिकांत मडावी, धनंजय श्रीरामे, चालक नरेश राउत, सर्व स्थागुशा यांचे पथकाने यशस्वीरित्या पार पाडली आहे.

17.11.22

( प्रदीप परदेशी )
पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ

Scanned with OKEN Scanner